नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
शाखा कार्यालय, नागपूर
प्रशासकीय इमारत क्र. १, दुसरा माळा, सिव्हील लाईन्स, नागपूर

दुरध्वनी क्र. -०७१२- २५६०३६६ ई-मेल - adtp_nagpurbranch@rediffmail.com

जा.क्र. अकृषीक/मौजा-.काटोल/ता. काटोल /ससंनाग / ७७८० दिनांक :- ७५ /११/२०१७

प्रति,

मुख्याधिकारी नगर परिषद,
काटोल

विषय :- नगर परिषद काटोल जि नागपूर
स.क्र.२९४ , मौजा -काटोल , तालुका- काटोल क्षेत्र २.२० हे. आर जमिनीस निवासी वापराकरिता अकृषक करण्याबाबत. (अंतिम अभिन्यास मंजुरीबाबत)

संदर्भ :- आपले पत्र क्र. नपका/वियो/ ६२/२०१७ दि. २०/४/२०१७

विषयांकित प्रकरणातील जागा निवासी वापरार्थ अकृषी करण्याकरिता अंतिम अभिन्यास मंजूरीचे प्रकरण आपले कार्यालयाचे संदर्भाधिन पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. उक्त जागेला या कार्यालयाचे पत्र क्र.८२१ , दि.३०.४.२०१५ अन्वये निवासी वापराकरीता जागेवर आखणीची शिफारस केलेली आहे.

या अनुषंगाने उप अधिक्षक भुमी अभिलेख, काटोल यांनी प्रत्यक्ष आखणी केलेला मोजणी नकाशा व अर्जदाराने स्वाक्षांकित केलेला अभिन्यास नकाशा या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर अभिन्यास नकाशा विकास नियंत्रण नियमावलीनुसार योग्य असून त्यानुसार खालील अटीवर अभिन्यास नकाशाला अंतिम मंजुरीची शिफारस करण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम-१२४ (ब) अन्वये च्या तरतुदीनुसार अर्जदाराने काटोल नगर परिषदकडे विकास शुल्काचा भरणा अर्जदार यांनी ३० दिवसाचे आत करणे आवश्यक राहील.

२) अभिन्यासातील 'खुली जागा' व 'सार्वजनिक प्रयोजनाकरीता' प्रस्तावीत केलेल्या जमीनी व्यतिरिक्त संपुर्ण अभिन्यासातील भुखंडाचा उपयोग फक्त निवासी वापराकरीताच करण्यात यावा. तसेच, भविष्यात भुखंडाचे विभाजन करु नये.

३) अभिन्यासातील 'खुली जागा', 'सार्वजनिक सोयी व सुविधा' खालील जागा, रस्ते, पुल, नाल्या इत्यादीचा विकास करण्याची जवाबदारी जमीन मालक / विकास कर्त्याची राहील व अभिन्यासातील 'खुली जागा' व रस्ते संबंधीत ग्रामपंचायतला हस्तांतरित करावे लागेल.

४) सदर अभिन्यासातील बांधकाम परवानगीस महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये कळमेश्वर नगर परिषद कडून मंजूरी घेणे आवश्यक राहील.

५) सदर रेखांकनामधील प्रस्तावित बांधकामास प्रादेशिक योजनेची तसेच अ ब क वर्ग नगर परिषद व नगर पंचायतीची विकास नियंत्रण नियमावली व तरतूदी लागू राहील.

६) पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (Rain Water Harvesting) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल.

७) जमिनीचे मालकी हक्काबाबत महसुल विभागाचे स्तरावर खात्री करून घेणे आवश्यक राहील.

८) अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठयाची व सांडपाण्याची प्रक्रीया करून विल्हेवाट करण्याची व्यवस्था जमिन मालक / विकासक यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील.

Scanned by CamScanner

९) सदर जागेवर पिण्याचे पाण्याची उपलब्धता असल्याबाबत संबंधित विभागाचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

१०) भविष्यात जागेबाबत वाद उपस्थित झाल्यास अभिन्यासांची केलेली शिफारस रद्द समजण्यात येईल.

११) सदर जागेवरील विद्युत वाहिनी रस्त्याचे कडेला स्थानांतरीत करणे बंधनकारक राहील.

१२) वरील अटींची पूर्तता होतांना अभिन्यासात फेरबदल झाल्यास सुधारीत अभिन्यासास मंजूरी प्राप्त करुन घ्यावी लागेल.

उपरोक्त शिफारस ही नियोजनाचे दृष्टीने करण्यात आली असून सदर जागेचे मालकी हक्कं तसेच इतर तद्नुषंगिक कागदपत्रे या बाबत आपले स्तरावर खात्री करुन घेण्यात यावी.

सदर प्रकरणी शिफारस करण्यात येत असलेल्या मंजूर अभिन्यास नकाशाची १ प्रत या कार्यालयाचे अभिलेखार्थ ठेऊन उर्वरित दोन प्रती यासोबत पाठविण्यात येत आहे.

सहपत्र :- वरीलप्रमाणे

(सु. प्र. थुल)
प्र.सहाय्यक संचालक, नगर रचना
नागपूर

Scanned by CamScanner